तरुण भारत

१० ऑक्टोबर २०१५

# गोखले महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'वैश्विक मानवी मूल्य शिक्षण- काळाची गरज' ही कार्यशाळा नुकतीच पार पडली. उद्घाटन डॉ. डी. आर. मोरे, डॉ. लेसन आझादी, डॉ. गोरखनाथ कांबळे, प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे, प्राचार्य जे. बी. पिष्टे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. स्मिता गिरी यांनी केले. यावेळी डॉ. लेसन आझादी, डॉ. गोरखनाथ कांबळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, अनुभव यासंदर्भात सविस्तर माहिती देत या कार्यशाळेचा हेतू सांगितला. कार्यशाळेत ७८ प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तस्मिया शेख, तेजश्री चिले, दिग्विजय माळकर, अनिकेत रूईकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्रा. जयकुमार देसाई, दौलत देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

# HUMAN VALUES

15-9-30
















